**<u>ठळक बातम्या</u>**

- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन/ सर्वत्र शोककळा - मान्यवरांनी वाहिली आदरांजली

- होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांची तात्काळ नाकेबंदी सुरू करण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

- महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थानं अंमलबजावणी करण्याची वेळ आली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबईत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना सुरु, तर आधीच्या सामन्यात गुजरात टायटन्सचा लखनौ सुपर जाएन्ट्सवर ७ गडी राखून विजय

**<><><><><>**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं आज मुंबईत निधन झालं. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांचं पार्थिव लोअर परळ इथल्या त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होतील. आशा भोसले यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली.

वयाच्या १०व्या वर्षापासून गायनक्षेत्रात असलेल्या आशा भोसले यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा थोडक्यात आढावा ऐकूया…

**- - - - कॅप्सूल- - - -**

*( आशा भोसले. गेली ८ दशकं गानरसिकांवर गारुड करणारा हा आवाज बदलत्या पिढ्यांना जवळचा, आपलासा वाटत राहिला.*

*१९४३ मधे माझा बाळ या चित्रपटाकरता त्यांचं पहिलं गाणं ध्वनिमुद्रित झालं, त्यानंतर भारतीय शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांपासून नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, गझल, लोकसंगीत, रवींद्र संगीत, एवढंच नाही तर पाश्चात्य पॉप संगीतातही त्यांच्या बहुआयामी*

*आवाज लीलया विहरत राहिला. दीनानाथांच्या तडफदार गायकीचा वारसा त्यांनी नाट्यगीतांमधून दीखवून दिला…. (युवती मना)*

*हिंदी चित्रपट संगितात सचिन देव बर्मन, ओ. पी. नय्यर, आरडी बर्मन, खय्याम, ते ए आर रहमानपर्यंत विविध पिढ्यांमधल्या दिग्गजांच्या संगीत दिग्दर्शनात आशाताईंनी अनेक गाणी आपल्या आवाजानं अजरामर केली, महंमद रफी, किशोर कुमार, यांच्यासारख्या अफाट रेंज असलेल्या गायकांसोबत युगुलगीतं गातानाही हे वेगळेपण त्यांनी जपलं. भारतीय संगिताला अपरिचित असणाऱ्या हरकती त्यांनी सहज घेतल्या. …(आ जा आजा )*

*फिल्मफेअर पुरस्कार मिळवून देणारं 'दम मारो दम'; 'जाने जा', ही गाणी आशाताईंच्या आवाजाचा नवा बाज दाखवून गेली. 'उमराव जान' मधली दिल चीज क्या है, इन ऑखोंकी मस्तीसारखी सगळीच गाणी गाजली. 'दिल चीज क्या है' या गीतासाठी. १९८१चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यानंतर 'इजाजत' चित्रपटातल्या 'मेरा कुछ सामान' या त्यांच्या गाण्यालाही १९८६चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.*

*मराठीत सुधीर फडके, हेमंत कुमार, लता मंगेशकर, सुरेश वाडकर, अनुराधा पौडवाल अशा गायक-गायिकांबरोबरची आशाताईंनी गायलेली गाणी रसिकांच्या मनात घर करून राहिली आहेत. तरुण आहे रात्र अजुनी, जिवलगा राहिले रे दूर, ही वाट दूर जाते, फुलले रे क्षण माझे, झिनी झिनी वाजे, गेले द्यायचे राहूनी, गंध फुलांचा गेला सांगून, आज कुणीतरी यावे, ऋतू हिरवा अशी शेकडो गाणी…. 'रेशमाच्या रेघांनी'तला लावणीचा ठसका, 'सैनिक हो तुमच्यासाठी'तला कृतज्ञ भाव, 'केव्हा तरी पहाटे'तली हुरहुर, 'जे वेड मजला लागले'ची गोडी, सगळेच विलक्षण!*

*आशाताईंनी ९०० चित्रपटांमधून आणि १४ भाषांमध्ये १२ हजारापेक्षा जास्त गाणी गायली. ८२, कशीश, मिराजे गजल अशा ध्वनीफितींमधल्या त्यांच्या मराठी, हिंदी गझला, मराठी भावगीतं, भक्तिगीतं वेगळीच.*

*मध्य प्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार, महाराष्ट्रभूषणसह राज्य सरकारचे १५ पेक्षा जास्त पुरस्कार आणि २००८ मध्ये मिळालेला भारत सरकारचा पद्मविभूषण सन्मान…. याबरोबरच चित्रपट क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार 'दादासाहेब फाळके पुरस्कार', भारत-पाकिस्तान असोसिएशनचा 'नाईटिंगेल ऑफ एशिया' हा पुरस्कार, ब्रिटनचे तत्कालीन प्रधानमंत्री टोनी ब्लेअर यांच्या हस्ते, बी.बी.सी.च्या वतीनं जीवनगौरव पुरस्कारही त्यांना*

*मिळाला. ग्रॅमी पुरस्कारासाठी देखील त्यांना दोन वेळा नामांकन मिळालं होतं. १२ हजार गाणी ध्वनिमुद्रित करण्याच्या त्यांच्या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सनं घेतली होती. ८० वर्षांहून अधिक काळ सुरु असलेली आशाताईंची स्वरयात्रा आज थांबली. मात्र या दीर्घ मैफिलीत त्यांनी गाईलेल्या गाण्यांसह त्यांचा आवाज रसिकांच्या मनात कायम रुणझुणत राहील. (उरले उरात काही आवाज …..)*

**<><><><><>**

आशा भोसले यांच्या निधन वार्तेनं सर्वत्र शोककळा पसरली आहे. आशा भोसले यांच्या निधनामुळे संगीत क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे. आपल्या अष्टपैलु गायनामुळे आशाताईंनी भारतीय संगीतावर आपली एक अमिट छाप उमटवली आहे, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. आशा भोसले यांच्या निधनामुळे आपल्याला तीव्र दुःख झालं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे**.**

केंद्रीय मंत्री अमित शहा, नितिन गडकरी, पीयूष गोयल, मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, योगी आदित्यनाथ यांनीही आशाताईंना श्रद्धांजली वाहिली आहे. महारहाष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही आशाताईंच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

संगीत क्षेत्रातून गायक शंकर महादेवन, उषा उथप, ए. आर. रहमान, रोणु मुजुमदार, संगीतकार एहसान, ललित पंडित, अनु मलिक, सलील कुलकर्णी यांनी आशा भोसले यांना आदरांजली वाहिली आहे. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, तसंच मनोरंजन क्षेत्रातल्या हेमा मालिनी, अनुपम खेर, मधुर भांडारकर, अक्षय कुमार, उर्मिला मातोंडकर अशा विविध मान्यवरांनी आशाताईंना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराण यांच्यातली चर्चा निष्फळ ठरल्यामुळे अमेरिकन नौदल होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांची तात्काळ नाकेबंदी सुरू करेल असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इराणला आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात टोल देणाऱ्या प्रत्येक जहाजाचा शोध घेऊन त्याला रोखण्याचे निर्देश आपण अमेरिकेच्या नौदलाला दिल्याचं ट्रम्प यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं आहे. इराणला टोल देणाऱ्या कुठल्याही जहाजाला खुल्या समुद्रात

सुरक्षित मार्ग मिळणार नसल्याचंही ट्रम्प म्हणाले आहेत. वाटाघाटी निष्फळ ठरण्यामागे अणुक्षेत्रातली इराणची महत्त्वाकांक्षा हेच मूळ कारण असल्याचंही ट्रम्प म्हणाले आहेत.

<><><><><>

महिला आरक्षण कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याची, तसंच २०२९ ला होणार असलेल्या लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका महिला आरक्षणाच्या तरतुदीसह पार पडतील याची सुनिश्चिती करण्याची वेळ आली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात त्यांनी लोकसभा आणि राज्यसभेतल्या विविध पक्षांच्या गटनेत्यांना पत्र लिहीलं आहे. सर्व सदस्यांनी, महिला आरक्षण कायद्यातल्या सुधारणेसाठीचं, नारी शक्ती वंदन अधिनियम एकमतानं संमत करण्यासाठी एकत्र यावं असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी या पत्रातून केलं आहे.

येत्या १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचं विशेष अधिवेशन होणार आहे, त्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी हे पत्र लिहीलं आहे. या अधिवेशनात उपस्थित राहण्याचा पक्षादेश भाजपानं त्यांच्या खासदारांसाठी काढला आहे.

<><><><><>

मतदारसंघांची पुनर्रचना आणि  इतर संबंधित तपशिलांशिवाय महिला आरक्षण कायद्यावर कोणतीही उपयुक्त चर्चा करणं शक्य नसल्याचं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात प्रधानमंत्र्यांनी लिहीलेल्या पत्राच्या उत्तरात खर्गे यांनी  येत्या २९ एप्रिल रोजी विविध राज्यांमध्ये सुरु असलेल्या विधानसभा निवडणुकांचे सर्व टप्पे पूर्ण झाल्यावर, या मुद्यावर सर्वपक्षीय बैठक बोलवावी अशी मागणी केली आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या ८ षटकात बिनबाद

त्याआधी या स्पर्धेत आज लखनौ इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं लखनौ सुपर जाएन्टसवर ७ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपर जाएन्टसनं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १६४ धावा केल्या. गुजरात टायटन्सनं ही

धावसंख्या ३ गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले ८ चेंडू बाकी असतानाच पार केली. जोस बटलरनं ६०, तर शुभमन गिलनं ५५ धावा केल्या.

<><><><><>

वार्षिक अमरनाथ यात्रा यंदा ३ जुलै ते २८ ऑगस्ट दरम्यान असेल अशी घोषणा जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये केली आहे. ज्येष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने २९ जून रोजी भगवान शिवाची प्रथम पूजा होईल. या यात्रेसाठी आगाऊ नोंदणी १५ एप्रिलपासून ऑनलाइन आणि ऑफलाईन पद्धतीनं सुरू होईल. जम्मू आणि काश्मीर बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि येस बँक या बँकांच्या देशभरातल्या एकूण ५५४ शाखांमध्ये नोंदणीची सुविधा उपलब्ध असेल.

<><><><><>

पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूत विधानसभा निवडणुकीच्या प्रचारानं जोर धरला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमधे कावाखली इथं प्रचारसभेला संबोधित केलं.

तमिळनाडूत, भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज विरुधुनगर जिल्ह्यात सात्तूर इथं प्रचार रॅलीत भाग घेतला. अण्णा द्रमुक पीएमके यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांचे कार्यकर्तेही या रॅलीत सहभागी झाले होते.

//<><><><><>//